पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/०१/२०२२** वेळ - **दुपारी ३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.विधी समिती** ची पाक्षिक सभा **शुक्रवार,** दिनांक **०७/०१/२०२२** रोजी दुपारी **३.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.सुनिता हेमंत तापकीर
३. मा.वसंत प्रभाकर बोराटे
४. मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.सुभाष इंगळे - उप आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये सुधारणा/बदल करणेबाबत.
मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.२ मधील जाधव सरकार चौक ते सावतामाळी मंदिरापर्यंतचा रस्त्यालगत फुटपाथ विकसीत करणे कामाबाबत.
मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी येथील जुनी धोकादायक शाळा इमारत पाडून त्या ठिकाणी सांस्कृतिक केंद्र बांधणेकामाबाबत.
मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.२ मधील स्पाईन रस्त्यालगत से.नं.१६ रोजे शिवाजीनगर गुलमोहर हौसिंग सोसायटी ते जाधव सरकार चौकापर्यंत फुटपाथ विकसीत करणे कामाबाबत.
मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

---------

अ) मा.विधी समिती सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०३**) दि.२०/१२/२०२१ चा सभावृतांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०७/०१/२०२२ विभाग - प्रशासन
सुचक - मा.सुनिता तापकीर अनुमोदक - मा.वसंत बोराटे
संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१५१०/२०२१, दि. २७/१२/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'सह आयुक्त'** अभिनामाचे १ पद **पे.लेवल S-२४ वेतनश्रेणी ७११००-२११९००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता रिक्त आहे. **सह आयुक्त'** अभिनामाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १४/१०/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व**'उप आयुक्त'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्च, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **'उप आयुक्त'** यांना पदोन्नतीचे

आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'सह आयुक्त'** पदावर **पे.लेवल S-२४ वेतनश्रेणी ७११००-२११९००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **उप आयुक्त नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | श्रीम.दुरगुडे आशादेवी मारुती | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **'उप आयुक्त'** यांना **पे.लेवल S-२४ वेतनश्रेणी ७११००-२११९००** मध्ये **'सह आयुक्त'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०७/०१/२०२२

सुचक - मा. वसंत बोराटे अनुमोदक - मा. सुनिता तापकीर

संदर्भ - मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सुरक्षा विभागामध्ये सुरक्षा रक्षक, सुरक्षा सुपरवायझर, सुरक्षा निरिक्षक, सहा सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी असा पदोन्नती सोपन महाराष्ट्र शासनाने असाधारण भाग चार ब दि.१८/०२/२०२० नुसार निश्चित करणेत आला आहे. बरेच सुरक्षा रक्षक हे १० पेक्षा

कमी शैक्षणिक अर्हतेचे असलेने त्यांस पदोन्नतीचा लाभ मिळावा या दृष्टीकोनातून सुरक्षा सुपरवायझर व सुरक्षा निरिक्षक असा पदोन्नती सोपान ठरवणेत आलेला आहे तथापि जे सुरक्षा रक्षक उच्च शिक्षित आहेत म्हणजे पदवीधर आहेत अशांकरिता पदोन्न्ती मिळणेसाठी सदर सुरक्षा सुपरवायझर, सुरक्षा निरिक्षक अशी पदोन्नती घेवूनच सहा सुरक्षा अधिकारी ह्या पदावर पदोन्नती मिळु शकते जे सुरक्षा रक्षक पदवीधर आहेत तथापी सेवाजेष्ठतेत मागे आहेत त्यांस सहा सुरक्षा अधिकारी पदावर पदोन्न्ती देणे प्रशासकिय दृष्ट्या शक्य नाही व पदवीधर सुरक्षा रक्षकांवर ही बाब अन्यायकारक आहे. सबब महाराष्ट्र शासनाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मध्ये खालील प्रमाणे सुधारणा / बदल करणेसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे तातडीने पाठविणेकरिता मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| **अ. क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती** | **नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती पहा नियम (३)** |
|---|---|---|---|---|
| ९४ | सुरक्षा सेवा गट-ब | सहा.सुरक्षा अधिकारी | पदोन्नती १००% | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२)पिंपरी चिंचवडमहानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सुरक्षा रक्षक या पदावरील किमान १५ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या पदविधर कर्मचा-यांची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती देणे. |

सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता मा.महानगरपालिका सभेकडे पाठविण्याता यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०७/०१/२०२२

सुचक - मा. वसंत बोराटे अनुमोदक - मा. सुनिता तापकीर

संदर्भ - मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

म.न.पा.च्या प्रभाग क्र.२ मधील जाधव सरकार चौक ते सावतामाळी मंदिरापर्यंतचा रस्त्यालगत फुटपाथ विकसित करणे या कामाचे जागेवर प्रभाग क्र.२ से.नं.१६ राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्ययावत पद्धतीने करणे या कामाअंतर्गत फुटपाथ विकसीत करणेत येणार आहे. त्यामुळे प्रभाग क्र.२ मधील जाधव सरकार चौक ते सावतामाळी मंदिरापर्यंतचा रस्त्यालगत फुटपाथ विकसीत करणेचे काम प्रभागातील मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणीप्रमाणे प्रभागामध्ये इतरत्र ठिकाणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०७/०१/२०२२

सुचक - मा. वसंत बोराटे अनुमोदक - मा. सुनिता तापकीर

संदर्भ - मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

म.न.पा.च्या प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी येथील जुनी धोकादायक शाळा इमारत पाडून त्या ठिकाणी सांस्कृतिक केंद्र बांधणे कामाअंतर्गत जुनी धोकादायक शाळा इमारत पाडलेनंतर मुळ जागा मालक यांनी नविन इमारत बांधणेस हरकत घेतल्यामुळे विषयांकित कामाअंतर्गत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणा कडून गेल इंडिया ऑफीसच्या समोरील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या मोकळ्या जागेवर जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणेचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०७/०१/२०२२

सुचक - मा. वसंत बोराटे अनुमोदक - मा. सुनिता तापकीर

संदर्भ - मा.वसंत बोराटे व मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

म.न.पा.च्या प्रभाग क्र.२ मधील स्पाईन रस्त्यालगत से.नं.१६ राजेशिवाजीनगर गुलमोहर हौसिंग सोसायटी ते जाधवसरकार चौकापर्यंत फुटपाथ विकसीत करणे या कामाचे जागेवर प्रभाग क्र.२ से.नं.१६ राजे शिवाजीनगर मधील रस्ते अद्यावत पद्धतीने

करणे या कामाअंतर्गत फुटपाथ विकसीत करणेत येणार आहे. त्यामुळे प्रभाग क्र.२ मधील स्पाईन रस्त्यालगत से.नं.१६ राजेशिवाजीनगर गुलमोहर हौसिंग सोसायटी ते जाधवसरकार चौकापर्यंत फुटपाथ विकसीत करणे चे काम प्रभागातील मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणी प्रमाणे प्रभागामध्ये इतरत्र ठिकाणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/०९/२०२२
दिनांक : ०७/०१/२०२२

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना